N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर    **P.S.(ठाणे):** सिडको
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0574    **Year (वर्ष):** 2023
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/08/2023 02:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** मंगलवार    **Date From (दिनांक पासून):** 29/08/2023
      **Time Period (कालावधी):** पहर 7    **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/08/2023
      **Time From (वेळेपासून):** 20:25 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 20:35 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिनांक ):** 30/08/2023    **Time (वेळ):** 01:57 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 004
      **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/08/2023 01:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      उत्तर, 2 किमी    **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** समोरील रोडच्या बाजुला,जैस्वाल हल समोरील रोडच्या बाज,छत्रपती संभाजीनगर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then**
      (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
      **District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शेखर आप्पासाहेब जाधव

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 63,शिवशंकर कलनी,साईनगर, छत्रपती संभाजीनगर,सिडको ,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 63,शिवशंकर कलनी,साईनगर, छत्रपती संभाजीनगर,सिडको ,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | किरण काळुबा नागरे | | | 1. सिध्देश्वर नगर, जाधववाडी, बालाजी प्रोव्हीजन शेजारी, औरंगाबाद ,सिडको ,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सचिन बाबुराव विटोरे | | | 1. दक्षिण मुखी हनुमान मंदीर जवळ,रजनवन सोसायटी एन-9 हडको कर्न,औरंगाबाद,सिडको , औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**



Scanned with OKEN Scanner

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद
दिनांक 30/08/2023

मी शेखर आप्पासाहेब जाधव वय 33 वर्ष व्यवसाय - समाजकार्य रा. शिवशंकर कॉलनी प्लॉट नं 63 साईनगर, छत्रपती संभाजीनगर मो.नं 99232954467
समक्ष पोलीस स्टेशन सिडको औरंगाबाद शहर येथे हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी दिनांक 27/08/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद येथील पोलीस निरीक्षक श्री हनुमंत वारे यांच्याकडे मला होत असलेल्या लाचमागणी बाबतची तक्रार दिली होती ती पुढीलप्रमाणे," मी वरील प्रमाणे राहणार असुन समाजकार्य करतो तसेच माझा प्लॉट खेरदी विक्रीचा सुध्दा व्यवसाय करतो.
मी माझे पार्टनर सुनिल गायकवाड, रमेश भालेराव, चंद्रकांत गायकवाड यांचे सोबत गट न 100 पिसादेवी येथे आम्ही सर्वानी 5 हजार स्क्वेअर फुट प्लॉट घेतलेला असुन त्याची आम्ही रीतसर खरेदीखत करुन त्यानंतर नियमाप्रमाणे सातबारावर नाव आहेत. सदर प्लॉट मोजणी करण्याकरीता आम्ही भुमी अभिलेख कार्यालय औरंगाबाद येथे दिनांक 27/01/2023 रोजी रितसर अर्ज केला होता. सदर अर्जास अर्ज क्रमांक 19082 असे प्राप्त झाला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने मी 51,000/- ची शासकीय चलन भरले आहे. मी दिलेल्या मोजणी अर्जाच्या अनुषंगाने भुमी अभिलेख उप अधिक्षक कार्यालय औरंगाबाद यांचे कार्यालयाकडुन माझे प्लॉट मोजणी साठी दिनांक 05/06/2023 रोजी श्री एस.बी.विटोरे यांच्या नावे आदेश निघाला होता.
मी दिनांक 23/06/2023 रोजी माझे प्लॉट मोजणी करीता भुमी अभिलेख कार्यालय औरंगाबाद येथे गेलो असता भुमी अभिलेख कार्यालयातील श्री विटोरे यांना आमचे प्लॉची मोजणी करण्याची विनंती केली असता तेथे त्यांच्या कार्यालयातील श्री किरण नागरे हे हजर होते. त्यावेळी त्या दोघांनी मिळुन मला दीड लाख (1,50,000/-) रुपये दिले तरच आम्ही तुमचा प्लॉट मोजणी करुन काढुन देऊ व तसा नकाशा तुम्हाला तयार करुन देऊ असे म्हणाले होते. मी त्यांना म्हणलो की, आम्ही शासकीय चलन 51,000/- पाहिले भरलेले आहे. तुम्ही मोजणी करुन नकाशा देऊन टाका. दीड लाख रुपये कशाचे ते जास्त होतात असे म्हणाले असता ते दोघे मला म्हणाले की कमीत 1,10,000/- रुपये दयावे लागतील आम्हाला हे पैसे सर्वांना वाटावे लागतात तुम्ही 1,10,000/- रुपये दिले तरच आम्ही तुमच्या प्लॉटची मोजणी करुन प्लॉट काढुन दिल्याचा नकाशा तयार करुन देऊ असे म्हणले होते. मी नाईलाजस्तव त्यांना हो म्हणुन निघुन आलो होतो.
दिनांक 25/06/2023 रोजी भुमी अभिलेख कार्यालयातील मोजणी अधिकारी श्री नागरे यांनी मला फोन करुन त्यांच्या कार्यालयात बोलावुन घेतले. मी त्यांच्या कार्यालयात गेलो असता मोजणी अधिकारी श्री विटोरे व श्री किरण नागरे मला म्हणाले की, तुम्ही आता पर्यंत ठरलेले 1,10,000/- रुपये का दिले नाही तुम्ही जर ठरलेले पैसे दिले नाहीतर आम्ही तुमच्या प्लॉटची मोजणी करणार नाही व मोजणी केल्याचा नकाशाही देणार नाही असे म्हणाले. त्यामुळे नाईलाजस्तव पैसे दिले नाहीतर हे मोजणी करणार नाहीत व नकाशाही काढुन देणार नाहीत म्हणुन मी त्यांना त्या दिवशी 50,000/- रुपये दिले होते. पैसे दिल्यानंतर दिनांक 04/07/2023 रोजी आमच्या प्लॉटची मोजणी श्री विटोरे व श्री किरण नागरे यांनी केली. सुमारे आठ दिवसापुर्वी मी श्री नागरे व श्री विटोरे यांच्याकडे त्यांच्या ऑफीस मध्ये जाऊन मोजणी नकाशाची मागणी केली असता ते मला म्हणाले की, ठरलेल्या 1,10,000/- रुपयापैकी पुर्वी 50,000/- रुपये तुम्ही आम्हाला दिले असुन तुमच्याकडे 60,000/-रुपये बाकी आहेत.



Scanned with OKEN Scanner

60,000/- रुपये दिल्याशिवाय आम्ही तुम्हाला तुमच्या प्लॉटचा मोजणी नकाशा देणार नाही असे म्हणाल्याने मी त्यांना आठ ते दहा दिवसात पार्टनरशी चर्चा करुन पैसे आणुन देतो असे नाईलाजस्तव म्हणुन निघुन आलो होतो. मला श्री किरण नागरे व श्री विटोरे हे मागत असलेले 60,000/- रुपये हे शासकीय चलनाच्या व्यतिरिक्त लाच म्हणुन मागत असल्याचे माझ्या लक्षात आले होते.

मी दिनांक 29/08/2023 रोजी भुमी अभिलेख कार्यालय औरंगाबाद येथे श्री किरण नागरे व श्री विटोरे यांना भेटण्यासाठी जाणार आहे. जर श्री किरण नागरे व श्री विटोरे यांनी माझ्याकडे माझे गट न 100 पिसादेवी मधील 5 हजार स्क्वेअर फुट प्लॉटची दिनांक 04/07/2023 रोजी केलेल्या मोजणीचा नकाशा देण्यासाठी 60,000/- रुपये लाचेची रक्कम मागणी केल्यास किंवा इतरामार्फत मागणी करुन स्विकारल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी. कारण माझी त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यांचेशी माझा काहीएक देण्याघेण्याचा उसनवारीचा व्यवहार नाही. तसेच त्यांचेशी माझी वैर अगर दुश्मनी नाही. त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्याची पडताळणी करुन सदर लाचेची रक्कम त्यांनी स्वत अथवा इतरामार्फत स्विकारल्यास त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करावी. "अशी तक्रार दिली होती.

माझे तक्रारीचे अनुषंगाने पडताळणी करणेकामी शासकीय दोन पंचांना पोलीस निरीक्षक श्री. हनुमंत वारे यांनी दिनांक 27/08/2023 रोजी बोलावुन त्यांचा ओळख परिचय करून देवुन त्यांची नावे 1)श्री.बापुराव सखाराम खडसे वय 56 वर्ष व्यवसाय- नोकरी, पद- वरिष्ठ लिपीक, प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प औरंगाबाद रा. °»Öò™ü नं 4, पियुश अपार्टमेन्ट यमुना कॉलनी, भावसिंगपुरा रोड, औरंगाबाद, 2)श्री.संतोष जयलाल राठोड वय 40 वर्ष, व्यवसाय- नोकरी, पद- प्रयोगशाळा सहाय्यक रा. प्लॉट नं 16 नंदनवन कॉलनी औरंगाबाद असे असल्याचे सांगितले. मी माझी तक्रार पंचांना तोंडी सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. वारे यांनी माझी टंकलिखीत दिलेली तक्रार पंचांना वाचण्यास दिली. पंचांनी ती वाचल्यानंतर मी, पोलीस निरीक्षक श्री. वारे व पंचांनी सदर तक्रारीवर सह्या केल्या. त्यानंतर दिनांक 29/08/2023 रोजी श्री.किरण नागरे व श्री विटोरे यांना भेटण्यासाठी मी भुमी अभिलेख कार्यालय औरंगाबाद येथे जाणार असल्याने तेथे जावुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय पोलीस निरीक्षक श्री.वारे यांनी माझे व पंचांचे संमतीने घेतला.

त्यावरून आज दिनांक 29/08/2023 रोजी पोलीस निरीक्षक श्री. वारे, दोन्ही पंच व सापळा पथकसह सुभेदारी गेस्ट हाऊसचे जवळील मैदानातील सुरक्षित ठिकाणी येऊन थांबले त्यांनतर मी माझ्याकडील चारचाकी वाहनाने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी पोहचलो. तेथे पोलीस निरीक्षक श्री वारे यांनी आम्हाला थोडक्यात मार्गदर्शन करुन सुचना दिल्या. सापळा कारवाई डिजीटल व्हाईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगुन आम्हास डिजीटल व्हाईस रेकॉर्डर प्रात्याक्षिक करुन दाखविले. त्यानंतर सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये पंचासमक्ष नवीन मेमरी कार्ड टाकुन ते चालु करुन माझ्याजवळ देऊन मला व पंच क्र 1 श्री खडसे यांना माझ्याकडील खाजगी चारचाकी वाहनाने सुभेदारी गेस्ट हाऊसचे जवळील मैदानातील सुरक्षित ठिकाणीवरुन श्री किरण नागरे व श्री विटोरे यांची भुमी अभिलेख कार्यालय औरंगाबाद येथे जाऊन भेट घेण्यासाठी पाठविले. आम्ही भुमी अभिलेख कार्यालय औरंगाबाद येथे जाऊन श्री. किरण नागरे व श्री विटोरे यांची भेट घेतली असता श्री. किरण नागरे व श्री विटोरे या दोघांनी माझ्याकडे गट न 100 पिसादेवी येथे 5 हजार स्केअर फुट प्लॉटच्या मोजणीचा नकाशा तयार करुन देण्यासाठी 60,000/- रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी करुन सदरची रक्कम सायंकाळी आणुन देण्याचे सांगुन ती त्या दोघांनी रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. नंतर मी व पंच क्र. 1 श्री. खडसे असे माझे खाजगी चारचाकी वाहनाने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो.

लाच मागणीमध्ये झालेली सविस्तर माहिती मी व पंच क्रमांक 1 श्री खडसे यांनी पोलीस निरीक्षक श्री वारे यांना दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री वारे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील श्री किरण नागरे व श्री विटोरे यांच्याशी झालेले लाचमागणीतील संभाषण एैकले व लाचमागणी झाल्याची खात्री केली. त्यावरुन श्री. किरण नागरे व श्री विटोरे यांचेविरूध्द सापळा लावण्याचा निर्णय माझ्या व पंचांच्या संमतीने पोलीस निरीक्षक श्री. वारे यांनी घेतला. काही वेळाने पोलीस निरीक्षक श्री वारे यांच्या सुचनेवरुन मी श्री किरण नागरे यांना फोन करुन कोठे येणे बाबत विचारणा केली असता त्यांनी मला जैस्वाल हॉल समोरील रोडच्या बाजुला येण्याचे सांगीतले. सदरची माहिती मी पोलीस निरीक्षक श्री वारे यांना दिली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. वारे यांनी मला, सापळा पथकास व दोन्ही पंचास सापळा कारवाईचे अनुषंगाने टि सेंटर जवळील गार्डच्या बाजुला सुरक्षित जागी सुचना दिल्या. तेव्हा श्री. किरण नागरे व श्री विटोरे यांना लाच म्हणुन देण्याकरीता 500/- रूपये दराच्या 120 चलनी नोटा मी हजर केल्या. त्यावेळी मला व पंचांना ॲन्थ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत प्रात्यक्षिक करून दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावुन माझे पॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिशात ठेवण्यात आल्या. व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस

रेकॉर्डर चालु करून माझेकडे देण्यात आले. पोलीस निरीक्षक श्री. वारे यांचे सुचनेप्रमाणे मी, पंच क्र.2 श्री. राठोड यांना सोबत घेवुन माझ्या खाजगी चार चाकी वाहनाने जैस्वाल हॉल समोरील रोडच्या बाजुला गेलो. तेथे श्री किरण नागरे व श्री विटोरे हे रस्त्याच्या बाजुला उभे होते. माझ्या पाठोपाठ पोलीस निरीक्षक श्री. वारे, सापळा पथक व पंच क्र.1 श्री. खडसे असे येवुन कोणास संशय येणार नाही अशा रीतीने सापळा लावुन थांबले. मी माझे वाहन बंद करुन श्री किरण नागरे व श्री विटोरे यांच्याकडे गेलो तेथे आमच्या कामासंबंधाने चर्चा झाली. त्यांनी माझ्याजवळ माझ्या प्लॉटची मोजणीचा नकाशा मला दिला. त्यानंतर लाचेची मागणी केल्याप्रमाणे माझ्या पॅन्टचे समोरील उजव्या बाजुच्या खिशातुन 60,000/- रुपये लाचेची रक्कम उजव्या हाताने काढुन श्री किरण नागरे व श्री विटोरे यांच्या समोर धरुन म्हणलो की साठ हजार रुपये आहे मोजुन घ्या त्यावर श्री विटोरे म्हणला की, काही हरकत नाही असे म्हणुन श्री विटोरे यांनी सदर लाचेचे 60,000/- रुपये रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर मी 20.25 वाजेच्या सुमारास पुर्वनियोजीत इशारा करताच पोलीस निरीक्षक श्री. वारे, सापळा पथक, पंच क्र.1 श्री. खडसे यांचेसह तेथे हजर आले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री.वारे यांनी श्री. किरण नागरे व श्री विटोरे यांना ओळख परिचय देवुन त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव 1)किरण काळुबा नागरे वय 43 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- भुमापक, नेमणुक भुमी अभिलेख कार्यालय औरंगाबाद व 2) सचिन बाबुराव विटोरे वय 35 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- भुमापक, नेमणुक भुमी अभिलेख कार्यालय औरंगाबाद असे सांगितले. श्री सचिन विटोरे यांच्याकडुन लाचेची रक्कम 60,000/- रूपये पंचासमक्ष जप्त करण्यात आली असुन सदर नोटांचे क्रमांक व वर्णन मी हजर केलेल्या नोटांशी दोन्ही पंचांनी तपासणी केली असता तंतोतंत जुळुन आले आहे. त्यानंतर आलोसे श्री किरण नागरे यांना वाहनात बसवुन अंधार करुन त्यांच्या दोन्ही हातावर व पॅन्टवर अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या प्रकाशझोतात पाहणी केली असता त्यांच्या हातावर ऍन्थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली नाही. त्यानंतर आलोसे श्री सचिन विटोरे यांना वाहनात बसवुन अंधार करुन त्यांच्या दोन्ही हातावर व पॅन्टवर अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या प्रकाशझोतात पाहणी केली असता त्यांच्या उजव्या हातावर व पॅन्टच्या उजव्या खिशावर ऍन्थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली सदरची बाब श्री किरण नागरे व श्री सचिन विटोरे यांच्या निदर्शनास आणुन दिली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): पो.नि. वारे ला.प्र.वि. औरंगाबाद यांचे कडे वर्ग केले. **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Shradha Ashok Waydande
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): 15101000402saw
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

अशा प्रकारे दिनांक 29/08/2023 रोजी आरोपी लोकसेवक 1)किरण काळुबा नागरे वय 43 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- भुमापक, भुमी अभिलेख कार्यालय औरंगाबाद रा. बालजी प्रोव्हीजन शेजारी न्यु एस.टी कॉलनी जवळ सिध्देश्वर नगर, जाधववाडी औरंगाबाद व 2) सचिन विटोरे वय 35 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- भुमापक, नेमणुक भुमी अभिलेख कार्यालय औरंगाबाद रा. दक्षिण मुखी हनुमान मंदीर जवळ श्री जोशी या किरायाने रंजनवन सोसायटी एन-9 हडको कॉर्नर औरंगाबाद यांनी माझ्याकडे गट न 100 पिसादेवी येथे 5 हजार स्केअर फुट प्लॉट मोजणी देण्यासाठी व तसा नकाशा तयार करुन देण्यासाठी म्हणुन 60,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केले. मागणी प्र 60,000/- रूपये लाचेची रक्कम 20.25 वाजता जैस्वाल हॉल समोरील रोडच्या बाजुला येथे पंचासमक्ष माझेकडुन आलोसे किरण काळुबा नागरे यांच समक्ष सचिन बाबुराव विटोरे यांनी स्वत: स्विकारली आहे, म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठी टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरे आहे.

समक्ष

हि फिर्याद दिली

Scanned with OKEN Scanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव)**:**

**District** (जिल्हा)**:**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**:**

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ)**:**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** GEETA MOTICHAND

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PI



Scanned with OKEN Scanner